

# महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्प २०१८-१९

# सर्वसाधारण चर्चा


**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन : **मुक्ता भारती**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९६६५००६४२९

विशेष सहाय्य :
**स्नेहा घरत,अनुश्री करवा, सुनिल मिश्रा, विलास सुवरे, राजश्री कदम, उमेश सांगळे**

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏ ०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०११-१२ पासून २०१८-१९पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

विश्लेषण आणि संकलन:रुपेश कीर -९८९२९३९६१७
मॅकेन्झी डाबरे - ९६६५००६४२९

**मार्गदर्शक-विवेक पंडित**
संस्थापक, समर्थन

# महाराष्ट्र राज्याची ठळक वैशिष्ट्ये

## दृष्टिक्षेपात महाराष्ट्र :

- राज्याची लोकसंख्या २०११च्या जनगणनेनुसार ११ कोटी २४ लाख असून त्यामध्ये पुरुषांची लोकसंख्या ५ कोटी ८२ लाख तर महिलांची लोकसंख्या ५ कोटी ४१ लाख आहे.
- भारताचा मानव विकास अहवाल २०११ नुसार देशाचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ आहे तर राज्यासाठी तो. ०.५७२ आहे.
- राज्यातील जन्मदर १५.९ असून देशात तो २०.८ आहे. तर राज्यात मृत्यूदर ५.९ देशात ६.५ आहे.
- राज्यात अर्भक मृत्यूदर २१ आहे तर देशात ३७ आहे तर माता मृत्यूचे राज्यात प्रमाण ६८ तर देशात १६७ आहे. (जन्मलेल्या दर १००० जीवित वा मृत मुलांमागे)
- २७ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक राज्याच्या एकूण मानव विकास निर्देशांकापेक्षा बराच कमी. नंदूरबार जिल्हा सर्वात पिछाडीवर (०.६०४) आहे.
- महाराष्ट्र राज्याचे स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ असून ते देशापेक्षा (९४३) कमी आहे. केरळ (१०८४), तामिळनाडू (९९६), कर्नाटक (९७३), उत्तर प्रदेश (९६३), मध्य प्रदेश (९३१) ही राज्ये महाराष्ट्राच्या पुढे आहेत.
- जागतिक बँकेच्या अभ्यासगटाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्रातील दारिद्र्य विकास आणि विषमता याबाबत महाराष्ट्र वर्ष २००५ नंतर झपाट्याने विकासाच्या दिशेने जात असून देशाच्या तुलनेत दारिद्र्याचे प्रमाण महाराष्ट्रात कमी होत असल्याचे दिसून येते आहे. तर दुसऱ्या बाजूला आदिवासी जिल्हे तसेच मराठवाड्यातील परभणी, बीड व हिंगोली या जिल्ह्यांतील दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे. देशातील दारिद्र्याचे सरासरी प्रमाण २२ टक्के आहे. तर महाराष्ट्रातील प्रमाण १७ टक्के आहे असे असले तरी महाराष्ट्रापेक्षा राजस्थान, तामिळनाडू, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यात राहणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण मात्र कमी आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या सेवा क्षेत्र व उद्योग क्षेत्रातील सकल उत्पन्न वाढीचा दर वाढताना दिसतो तर आर्थिक विषमतेचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील धुरीणांनी चिंता करावी असा हा अहवाल आहे.
- संपत्तीचे केंद्रीकरण होत आहे. आज मूठभरांच्या हाती संपत्ती केंद्रित होत असून बहुसंख्य जनता दारिद्र्याच्या खाईत ढकलली जात आहे. एकट्या मुंबईत २७०० लोकांकडे प्रत्येकी ६० कोटींपेक्षा जास्त संपत्ती आहे. भारत हा सर्वाधिक गरीब व मोजक्या पण सर्वाधिक श्रीमंत लोकांचा देश ठरला आहे. वर्ष २०१८ मध्ये देशातील केवळ १% लोकांकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाले

**असून आजच्या घडीला ७३% संपत्ती श्रीमंतांकडे आहे. मागील वर्षी श्रीमंत लोकांकडील संपत्तीचे प्रमाण ५८% होते त्यात १५%ने या वर्षी वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे ५०% गरीब जनतेकडे देशातील संपत्तीचा केवळ १% भाग आहे.** *(स्रोत: ऑक्सफॅम, २२/०१/२०१८)*

- **ग्लोबल हंगर इंडेक्सच्या २०१७ च्या अहवालानुसार भारताच्या दारिद्र्याचे प्रमाण दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांपेक्षा वाढलेले आहे. एकूण ११८ गरीब देशांच्या तुलनेत आपल्या देशाचा (१००) क्रमांक असून गेल्या वर्षी आपला क्रमांक (९७) वा होता याचा अर्थ दारिद्र्यरेषेखालील राहणाऱ्यांची संख्या वर्षभरात वाढली आहे. चीनचा क्रमांक आपल्यापेक्षा ७६ने कमी असून तो (२१) इतका आहे. त्याचप्रमाणे नेपाळ आपल्यापेक्षाही सुस्थितीत असून त्याचा क्रमांक (७२) आहे. म्यानमार (७७), श्रीलंका (८४), बांगलादेश (८८) तर भारत पाकिस्तान व अफगाणिस्थान सारख्या यादवी असलेल्या देशांच्याही पुढे आहोत.**

*(स्रोत: ग्लोबल हंगर इंडेक्स, २०१७चा अहवाल)*

## राज्याची आर्थिक स्थिती :

- राज्याची महसुली जमा रु. २ लाख ८५ हजार ९६७ कोटी अर्थसंकल्पीत केली असून मागील वर्षी म्हणजे वर्ष २०१७-१८मध्ये ती रु. २ लाख ५७ हजार ६०४ कोटी होती. तर महसुली खर्च रु. ३ लाख १ हजार ३४२ कोटी आहे म्हणजे रु. १५ हजार ३७५ कोटी महसुली तूट येईल असा अंदाज आहे. तर २०१६-१७ मध्ये प्रत्यक्ष महसुली तूट रु. ८ हजार ५३५ कोटींवर आली आहे.
- राज्याचा कर महसूल वर्ष २०१६-१७ मध्ये रु. १ लाख ७० हजार ३३१ कोटी असून करेतर महसूल रु. ३४ हजार ३६१ असा एकूण रु. २ लाख ४ हजार ६९३ आहे.
- वर्ष २०१५-१६ प्रमाणे महसुली तूट रु. ३ हजार ७५७ कोटी, वित्तीय तूट रु. ३० हजार ७३३ कोटी, कर्ज रु. ३ लाख ३३ हजार १६० कोटी आहे. वित्तीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी १.५६% असून कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १६.९२% अपेक्षित असून १४ व्या वित्त आयोगाने एकत्रित वित्तीय सुधारणेच्या मर्यादेत आहे.
- वर्ष २०१६-१७ साठी स्थूल राज्य उत्पन्न रु.१९ लाख ५९ हजार ९२० कोटी अपेक्षित.
- वर्ष २०१५-१६ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न रु. १ लाख ६५ हजार ४९१ होते. तर मागील वर्षी रु.१ लाख ४७ हजार ३९९ होते.
- राज्य शासनाने वेगवेगळ्या क्षेत्रात वर्ष २०१५-१६ मध्ये दिलेल्या हमीची रक्कम रु. ७ हजार ७७६ कोटी ५७ लाखांवर पोहोचली आहे.
- स्वयं सहाय्यता गटांकडे वर्ष २०१६-१७ मध्ये रु. १ हजार ६९७ कोटी कर्ज थकित होते.

## उद्योग :

- नोव्हेंबर २०१७ पर्यंत राज्यात निरनिराळ्या उद्योग प्रकल्पांतर्गत रु. ११ कोटी ८९ लाख ८१५ कोटींची गुंतवणूक होईल असे म्हटले होते. त्यापैकी केवळ रु. २ कोटी ९२ लाख २९२ कोटींची (२४.६%) गुंतवणूक झाली आहे तसेच ८ हजार ९७४ प्रकल्प (४५.३१%) कार्यान्वित झाले.
- वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यात रु. ११ लाख ८९ हजार ८१५ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीच्या तुलनेत केवळ रु. २ लाख ९२ हजार २५२ कोटी म्हणजे अपेक्षेच्या केवळ २४.६ टक्के इतकीच गुंतवणूक येऊ शकलेली आहे.
- या गुंतवणूकीतून १ कोटी इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र फक्त १२ लाख ६७ हजार इतकी रोजगार निर्मिती झाली आहे.
- वर्ष २०१६-१७ ची वित्तीय तूट रु. ३५ हजार ३१ कोटी इतकी होती, ती यावर्षी तब्बल रु. ३ हजार ७५८ कोटीने वाढून रु. ३८ हजार ७८९ कोटी इतकी झाली आहे. याचाच अर्थ सरकारकडे निधीची कमतरता आहे हे स्पष्ट झाले आहे.
- वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यावर रु. ३ लाख ७१ हजार ४७ कोटी इतके कर्ज होते ते यावर्षी रु. ४ लाख १३ हजार ४४ कोटी एवढे झाले आहे.
- 'मॅग्नेटिक महाराष्ट्र', 'मेक इन महाराष्ट्र या सारख्या घोषणा करणाऱ्या या सरकारने 'प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियाना'च्या प्रगतीची आकडेवारी दिली आहे. या अभियानातंर्गत रु. १ हजार ७१५ कोटी खर्च झाल्याचे तसेच २०१७-१८ मध्ये रु. ५ हजार ६२ कोटी खर्च झाल्याची सरकारी आकडेवारी सांगत असली तरी, प्रत्यक्षात मात्र राज्यभरात सर्वच्या सर्व सुमारे २ हजार २०० कौशल्य विकास केंद्रे पूर्णत: बंद आहेत.
- महाराष्ट्रात १९ हजार ८२६ औद्योगिक प्रस्ताव आलेत त्यापैकी केवळ ८ हजार ९७४ इतकेच प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. तसेच रु. ११ लाख ८९ हजार ८१५ कोटींची गुंतवणूक करण्याचे ठरले आहे मात्र आपल्या शेजारील गुजरात राज्यात १३ हजार ७८३ औद्योगिक प्रस्ताव आलेत मात्र रु. १५ लाख २२ हजार १२९ कोटींची गुंतवणूक झाली आहे. महाराष्ट्रापेक्षा रु. ३ लाख ३२ हजार ३१४ कोटींची गुंतवणूक गुजरातमध्ये अधिक झाली आहे.

## रोजगार :

- राज्यात बेरोजगारीच्या दराचे प्रमाण २.१% आहे.
- वर्ष २०१६-१७ ला रोजगार हमी अंतर्गत एकूण मनुष्य दिवस निर्मिती ७.०९ कोटी होती. २०१७-१८ डिसेंबर अखेरपर्यंत रोजगार हमी अंतर्गत एकूण मनुष्य दिवस निर्मिती ५.४७ कोटी इतकी होती. म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत १.६२ कोटी मनुष्य दिवस निर्मितीत घट झाली आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रगतीबाबतची आकडेवारी पहाता ती प्रगती नसून, ही अधोगती कशी आहे, हे स्पष्ट होते.
- वर्ष २०१६-१७ मध्ये रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या १४ लाख ३३ हजार इतकी होती, ती घट होऊन २०१७-१८ मध्ये १३ लाख ८६ हजार इतकी झाली आहे.
- १०० मनुष्य दिवस निर्मितीमध्येही लक्षणीय घट झाली असून २०१६-१७ मध्ये ७ कोटी ९ लाख रोजगार निर्मिती झाली होती, ती २०१७-१८ मध्ये ५ कोटी ४७ लाख इतकी झाली आहे.
- हे सरकार २०१६-१७ मध्ये प्रति कुटूंब सरासरी ४९ दिवस इतका रोजगार उपलब्ध करून देऊ शकले. मात्र २०१७-१८ मध्ये प्रति कुटूंब सरासरी ३९ दिवस रोजगार उपलब्ध करू देऊ शकले.
- वर्ष २०१६-१७ मध्ये रोजगार हमी योजनेसाठी रु. ४ हजार ४९४ कोटी सुधारित अंदाज करण्यात आले होते. त्यापैकी रु. ३ हजार ४० कोटी खर्चं झाले असून रु. १ हजार ४५४ कोटी कमी खर्च झाले आहेत. याचाच अर्थ एकूण निधीपैकी ३३ टक्के निधी कमी खर्च करण्यात आला आहे.
- राज्यामध्ये २ कोटी ११ लाख मजूरांनी रोजगार हमी योजनेतील रोजगारासाठी नोंदणी केली असून त्यापैकी केवळ ५१ लाख ३८ हजार मजूर प्रत्यक्ष कामाची मागणी करीत असल्याचे दिसून आले आहे.
- राज्यामध्ये एकूण जॉबकार्ड असलेल्या कुटुंबांच्या संख्या ८८ लाख ७२ हजार असून त्यापैकी केवळ १ लाख ६२ हजार २४५ जॉबकार्डधारकांना २०१७-१८ मध्ये १०० दिवसांचा रोजगार मिळालेला आहे.
- रोजगार पुरविलेल्या २७ लाख कुटुंबांना सरासरी ४५ दिवस रोजगार उपलब्ध झाला आहे.
- वर्ष २०१६-१७ मध्ये या योजनेवर रु. २ हजार ८९ कोटी २२ लाख इतका खर्च झाला होता, मात्र यातही लक्षणीय घट झाली असून, यावर्षी रु. १ हजार ५७९ कोटी ६७ लाख इतका खर्च या योजनेवर करण्यात आला आहे. याचाच अर्थ शहरी रोजगाराबरोबरच ग्रामीण रोजगार निर्माण करण्यामध्ये या सरकारला सपशेल अपयश आले आहे.
- राज्यात १ लाख ९५ हजार ३०१ सहकारी संस्था असून त्यापैकी ३६ हजार ४९६ सहकारी संस्था तोट्यात चालल्या आहेत.
- मुंबईचे दरडोई उत्पन्न रु. २ लाख ७९ हजार ९६५ आहे तर नंदुरबार सारख्या जिल्ह्यात दरडोई उत्पन्न केवळ रु. ७८ हजार ५३१ आहे. (सर्वात कमी - नंदुरबार, वाशिम व हिंगोली)
- १४ व्या वित्त आयोगानुसार राज्याला केंद्राकडून वर्ष २०१७-१८ साठी रु. ३७ हजार ४०५ कोटी मिळणार आहेत.
- वर्ष २०१७-१८ मध्ये कर्ज रु. ४ लाख १३ हजार ४४ कोटी असून व्याजाच्या परतफेडीसाठी रु. ३१ हजार २७ कोटी द्यावे लागणार आहेत.

- **नोटाबंदी व जीएसटीमुळे राज्याचे आर्थिक गणित बिघडले असताना जीएसटीमधील गोंधळाचा फायदा घेत व्यापाऱ्यांनी सुमारे रु. ३४ हजार कोटींचा महसूल बुडविल्याची माहिती समोर आली आहे.** *(स्रोत: महाराष्ट्र टाइम्स मार्च -२०१८)*

- **वर्ष २०१६-१७ मध्ये शासनाने रु. १ हजार १ कोटी २ लाखाचा महसूल माफ केला यामध्ये उद्योग, ऊर्जा व कामगार अंतर्गत ऊर्जा विभागाचे विद्युत शुल्काची रक्कम रु. ८५५ कोटी ४८ लाख एवढी मोठी होती. माफ केलेल्या महसूलामध्ये ही रक्कम ८५ टक्के पेक्षा जास्त.** (*स्रोत: महाराष्ट्र राज्याचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण पुस्तिका)*

## राज्याची शैक्षणिक स्थिती :

- **राज्याची लोकसंख्या ११ कोटी २४ लाख असून त्यापैकी १ कोटी ६३ लाख व्यक्ती निरक्षर आहेत.**

- **वर्ष २०१७-१८ मध्ये प्राथमिक शाळांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत १ हजार ५५७ ने वाढून १ लाख ६ हजार ५२७ झाली.**

- **राज्यातील गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच अवर्षणप्रवण क्षेत्रातील विद्यार्थी व आदिवासी समाजातील ३५ लाख ९७ हजार विद्यार्थ्यांसाठी वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते. मात्र २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होऊन ती ४ लाख ९१ हजार झाली म्हणजेच ३१ लाख ६ हजार विद्यार्थी - लाभार्थी घटलेले असून त्यांच्यावर होणाऱ्या खर्चातही मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. मागील वर्षी यासाठी रु.४४ कोटी ३० लाख खर्च करण्यात आले होते त्यामध्ये आता रु. ३१ कोटी ३२ लाखांची घट झालेली दिसते.**

- **मुलींच्या शिक्षणासाठी हे शासन किती संवेदनशील आहे हे वेळोवेळी सांगत असते. मात्र मुलींना मिळणारा उपस्थिती भत्ता, अहिल्याबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना तसेच ११वी व १२वीत शिकणाऱ्या विद्यार्थिनींना मोफत शिक्षण या योजनेसाठी वर्ष २०१५-१६ मध्ये रु. ४ कोटी ५२ लाख खर्च झाला होता तर २३ लाख विद्यार्थिनीनी या योजनेचा लाभ घेतला होता. त्यात २०१६-१७ मध्ये केवळ १६ लाख ९१ हजार विद्यार्थिनींना लाभ मिळाला म्हणजे ६ लाख ५० हजार लाभार्थी विद्यार्थिनीची घट झाली तर खर्चही रु. १२ कोटी ४३ लाखांनी घटला.**

- **राज्याने प्राथमिक शिक्षणास महत्त्व दिल्यामुळे साक्षरता दरात सातत्याने सुधारणा होत आहे. जनगणना २०११ नुसार अखिल भारतीय स्तरावरील ७३ टक्के साक्षरता दराच्या तुलनेत राज्याचा साक्षरता दर ८२.३ टक्के आहे.**

- **राज्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.३% आहे. मात्र त्याचवेळी अनुसूचित जातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण ७९.७% व अनुसूचित जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण त्याही पेक्षा कमी ६५.७% आहे.**

- शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थी संख्या वाढत असताना खर्चाला मात्र मोठ्या प्रमाणात कात्री लावली जात आहे. वर्ष २०१५-१६ मध्ये रु. १ हजार ५८८ कोटी खर्च करण्यात आले तर २०१६-१७ मध्ये फक्त रु. १ हजार २०२ कोटी करण्यात आले म्हणजे वर्षभरात तब्बल रु. ३८६ कोटींची कपात करण्यात आली.
- आर्थिक पाहणीमध्ये शिक्षणाबाबतच्या विशेष सर्वेक्षणाच्या निष्कर्षाचा उल्लेख आहे. या विशेष अभ्यासानुसार ९३.३ टक्के मुले शाळेत जात असून, शाळेत जात नसलेल्या ०.७ टक्के मुलांपैकी ०.३ टक्के मुले कधीच शाळेत गेली नव्हती, तर ०.४ टक्के मुलांचे नाव शाळेत नोंदविले आहे, पण ती मुले शाळेत जात नाहीत. एकीकडे सरकारच्याच सर्वेक्षणाने नोंदविलेले हे निष्कर्ष असताना दुसऱ्या बाजूला त्याच आर्थिक पाहणीमध्ये इयत्ता १ ली ते ८वी तील मुलांची पटसंख्या २०१६-१७ च्या तुलनेत यावर्षी घटलेली दिसते. ज्यात मुलींचे प्रमाण विशेष आहे.
- विद्यार्थी-शिक्षक प्रमाण हेही मागच्या वर्षीच्या तुलनेत घटलेले आहे. एकही मूल शाळाबाह्य नसल्याचा दावा करणाऱ्या या सरकारच्या आर्थिक पाहणीत २०१७-१८ मध्ये ४८ हजार ३७९ इतकी शाळाबाह्य मुले असून, त्यांच्या प्रशिक्षणाचा तसेच शाळेत नोंदणी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे अहवालात म्हटले आहे. शिक्षणाच्या आकडेवारी बाबतची ही विसंगती थक्क करणारी आहे.
- राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ३ हजार ७९६ एकशिक्षकी शाळा असून रायगड मध्ये सर्वात जास्त म्हणजे ३७२ (१०%) शाळा या एकशिक्षकी आहेत.
- 'समर्थन'ला प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात सर्व वर्गांची १० लाख ५५ हजार ५०६ पदे मंजूर असून त्यापैकी १ लाख ५७ हजार ९२३ (१५%)पदे रिक्त आहेत.
- शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्राची परिस्थिती चिंताजनक आहे. एकीकडे शाळाबाह्य मुलांच्या संख्येत शासनाने घोळ घातलेला असताना आर्थिक पाहणी अहवालानुसार सन २०१०-११ मध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत असलेले विद्यार्थी संख्या १ कोटी ७ लाख ११ हजार इतकी होती. यामध्ये सन २०१६-१७ मध्ये तब्बल ४० लाख ९६ हजार इतकी प्रचंड घट होत ती संख्या ६६ लाख १५ हजार इतकी राहिलेली आहे.

## कृषि व संलग्न कार्य:

- 'कृषि व संलग्न कार्य' क्षेत्रात मागील वर्षाच्या तुलनेत ८.३% घट अपेक्षित असून 'उद्योग व सेवा' क्षेत्रात अनुक्रमे ६.५% व ९.७% वाढ अपेक्षित आहे.
- राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी १४७ तालुक्यात अपुरा पाऊस.

- वर्ष २०१६-१७ मध्ये जलयुक्त शिवारासाठी ५,२९१ गावे निवडण्यात आली होती त्यापैकी ४,१६१ गावे पाणी टंचाईमुक्त करण्यात अपयश आले आहे.
- राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ३७.१% लोक उत्पन्नासाठी शेतीवर अवलंबून आहेत तर ४४.३% लोक नोकरी वा तत्सम व्यवसाय करतात.
- राष्ट्रीय कृषि विकास योजनेसाठी केंद्राकडून २०१४-१५ मध्ये रु. ९४२ कोटी ९ लाख, २०१५-१६ मध्ये रु. ७३० कोटी, २०१६-१७ मध्ये रु. ३३३ कोटी ७३ लाख प्राप्त झाले आहेत. म्हणजे केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या मदतीत टप्प्या-टप्प्याने घट झाली आहे.
- यावर्षी कृषी क्षेत्राची वाढ आधीच्या वर्षीच्या १२.५ टक्केच्या तुलनेत घसरून ८.३ टक्के झाली आहे.
- वर्ष २०१६-१७ मध्ये १ कोटी ७२ लाख मेट्रीक टन इतके अन्नधान्य निर्माण झाले असून त्यात यावर्षी ३१ लाख ४७ हजार मेट्रीक टनने घट झाली आहे.
- यावर्षी तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, कापूस यांच्या सरासरी उत्पादकतेमध्ये आंध्रप्रदेश, गुजरात, कर्नाटक, पंजाब, मध्यप्रदेश, तेलंगणा या राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र मागे पडला असून, तुरीचे व कापसाचे उत्पादन यात लक्षणीय घट झाली आहे.
- वर्ष २०१६-१७ च्या तुलनेत तुरीचे उत्पन्न ५३ टक्क्यांनी तर, कापसाचे उत्पादन ४४ टक्क्यांनी घसरल्याचा अंदाज आहे.
- राज्यातील मत्स्य उत्पादन सागरी तसेच गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन यातही घट झाली असून, वर्ष २०१६-१७ मध्ये ६.३६ लाख मेट्रीक टन होते. त्यात वर्ष २०१६-१७ मध्ये १.९८ लाख मेट्रीक टन इतकी घट झाली आहे.
- वर्ष २०१६ मध्ये मोठा गाजावाजा करून सुरू झालेली 'जलयुक्त शिवार योजना' मंदावली असून, २०१५-१६ मध्ये या योजनेअंतर्गत २ लाख ५३ हजार ८६२ कामे पूर्ण झाली होती. त्या तुलनेत २०१६-१७ मध्ये केवळ १ लाख ५१ हजार १०३ कामे पूर्ण झाली असून, जलसाठ्यातही लक्षणीय घट आहे.
- वर्ष २०१५-१६ मध्ये १० लाख ९२ हजार २८९ घनमीटर जलसाठा निर्माण झाला असून, २०१६-१७ मध्ये जलसाठा केवळ ५ लाख ८९ हजार ७५९ घनमीटर इतका आहे.
- १०० टक्के कामे पूर्ण झालेल्या गावांच्या संख्येतही घट झाली असून, वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये या योजनेवरील खर्चात लक्षणीय घट झाली आहे.
- वर्ष २०१५-१६ मध्ये या योजनेवर रु. ३ हजार ८३१ कोटी खर्च झाले होते, २०१६-१७ मध्ये मात्र रु. २ हजार २३५ कोटी इतकाच निधी उपलब्ध करून दिला आहे.

- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजनेतंर्गत प्राप्त झालेल्या दाव्यांमध्ये २०१५-१६ दाव्याची संख्या ३९०१च्या तुलनेत २०१६-१७ दाव्याची संख्या २,०४० मध्ये घट झाली असून, हे दावे निकाली काढण्याचा वेगही थंडावला आहे. या योजनेतंर्गत शेतकऱ्यांना भरपाईपोटी २०१५-१६ मध्ये रु. ५० कोटी ४३ लाख खर्च करण्यात आले होते, तर २०१६-१७ मध्ये या योजनेवर केवळ रु. १० कोटी ७५ लाख खर्च करण्यात आले होते.
- वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यांच्या मोठ-मोठ्या जाहिरात करणाऱ्या सरकारने निवडक पाणलोट क्षेत्रातील वनेतर सामूहिक जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रमातंर्गत केलेल्या वृक्ष लागवडीत मागच्या वर्षीच्या तुलनेत ३९ हेक्टरने घट झाली आहे.
- शासनाच्या उदासिनतेमुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. वर्ष २०१७-१८ मध्ये खरीप व रब्बी हंगामात पिक क्षेत्र व उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे दिसून येते. मागील वर्षाच्या तुलनेत खरीप हंगामात तृणधान्य, कडधान्य, तेलबिया आणि कापूस यामध्ये अनुक्रमे ४ टक्के, ४६ टक्के, १५ टक्के, ४४ टक्के घट अपेक्षित आहे. तर मागील वर्षाच्या तुलनेत रब्बी हंगामात तृणधान्य, कडधान्य, तेलबिया यामध्ये अनुक्रमे ३९ टक्के, ४ टक्के, ७३ टक्के घट अपेक्षित आहे.

## कुपोषण आणि दारिद्र्य:

- वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यात १४ हजार ३६८ बालकांचा मृत्यू झाला होता, त्यापैकी ३ हजार १३ बालमृत्यू हे अवघ्या १ महिन्याच्या आतील नवजात बालकांचे होते.
- कुपोषणामुळे होणारा बालमृत्यूंचा आकडा वाढत असताना पोषण कार्यक्रमावरील खर्चात घट होताना दिसते आहे. वर्ष २०१६-१७ मध्ये ७८७ कोटी खर्च झाले तर २०१७-१८ मध्ये केवळ ४७९ कोटी इतकेच खर्च झाले आहेत.
- राज्यात दरवर्षी १००० जन्मांमागे १९ अर्भकांचा मृत्यू होतो हे मा. आरोग्यमंत्र्यांनी स्वत: मान्य केले आहे.
- राज्यात आरोग्य अधिकाऱ्यांची ७ हजार ५२४ पदे मंजूर असून त्यापैकी १ हजार ६०३ पदे रिक्त आहेत. याचाच अर्थ २१ टक्के पदे रिक्त आहेत.
- राज्यात असलेल्या परिचारिकांची २४ हजार ८८३ पदे मंजूर असून त्यापैकी ३ हजार ३६ पदे रिक्त आहेत. याचात अर्थ १२ टक्के पदे रिक्त आहेत.
- स्वयंपाकासाठी स्वच्छ व किफायतशीर इंधन पुरविण्याच्या बाबतीत महाराष्ट्र अजूनही कोसो मैल दूर आहे. प्रगतशील व विकासशील राज्य असल्याच्या दावा करणाऱ्या राज्यात आजही ५७ टक्के जनता स्वयंपाकासाठी लाकूड, केरोसिन व इतर पारंपरिक इंधनाचा वापर करीत आहे.

- राज्यात आजमितीस २ कोटी ५६ लाख शिधापत्रिकाधारक आहेत. त्यापैकी सुमारे ४५ लाख दारिद्र्यरेषेखालील व २५ लाख 'अंत्योदय अन्न योजना' शिधापत्रिकाधारक आहेत. या कुटुंबांना शासनातर्फे तांदूळ, गहू, ज्वारी, मका, साखर, केरोसिन आदि वाजवी दरात उपलब्ध होतो. केंद्र शासनाने अन्न सुरक्षेअंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी कोटा ठरवून दिलेला आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या उदासिनतेमुळे केंद्र शासनाकडून नियमन केलेल्या धान्यामधूनही राज्य शासनाची उचल फार कमी असल्यामुळे प्राधान्य कुटुंबे व अंत्योदय कुटुंबांना पुरेसे धान्य उपलब्ध होत नसल्याचे वास्तव समोर आलेले आहे. सदर धान्य ठेवण्यासाठी आवश्यक गोदामे नसल्यामुळे महाराष्ट्र शासनाने गोदामे भाड्यावर घेतलेली आहेत. अयोग्य नियोजनामुळे उचल केलेले धान्य १०० टक्के वाटप होत नसल्याचे दिसून येते.

## राज्याची सामाजिक स्थिती:


- महिलांवरील अत्याचारांसंदर्भात २०१६-१७ मध्ये ३१,२७५ गुन्हे नोंदविले आहेत. सन २०१७-१८ डिसेंबरपर्यंत ३२ हजार १०० गुन्हे नोंदविले आहेत. महिलांवरील अत्याचारांसंदर्भात यावर्षी प्रचंड वाढ झालेली दिसून येते. मुख्यत: बलात्कार व विनयभंग या गुन्ह्यांत प्रचंड वाढ झालेली आहे.
- बालकांवरील अत्याचारांसंदर्भात वर्ष २०१६-१७ मध्ये १३ हजार ५९१ गुन्हे नोंदविले आहेत. सन २०१७-१८ डिसेंबर पर्यंत १५ हजार ५३४ गुन्हे नोंदविले आहेत. मार्च २०१८ पर्यंत सरासरी विचार करता हा आकडा ५ हजार १७८ ने वाढून २० हजारपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. बालकांवरील बलात्कार व अपहरण या गुन्ह्यात संतापजनक वाढ झालेली आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था पार कोलमडून पडल्याचे वास्तव महिला व बालकांवरील अत्याचारांवरून सिद्ध होते.
- वर्ष २०१७-१८ मध्ये अनुसूचित जमातींसाठी नियतव्यय रु. ६ हजार ७५४ कोटी इतका होता. २०१७-१८ या वर्षी एकूण खर्च रु. २ हजार ९९८ कोटी ३१ लाख इतका झाला. म्हणजेच नियतव्यय रकमेपेक्षा रु. ३ हजार ७५५ कोटी ६९ लाख इतका खर्च कमी करण्यात आला. २०१६-१७ मध्ये नियतव्यय रु. ६ हजार ७२५ कोटी ६५ लाख इतका आहे व डिसेंबर २०१६ पर्यंत फक्त रु. २ हजार ५६६ कोटी १ लाख इतकाच म्हणजे नियतव्यय रकमेपेक्षा ६५% कमी खर्च झाला.
- नागरी आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी वर्ष २०१६-१७ मध्ये रु. ७ कोटी नियतव्यय दाखविलेला आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत यामधील एक रुपयाही खर्च झालेला नव्हता. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रमासाठी रु. २१२कोटी ३० लाख नियतव्यय दाखविण्यात आलेला आहे. डिसेंबर २०१६ पर्यंत फक्त रु. ५ कोटी ३ लाख इतकाच निधी खर्च करण्यात आलेला आहे. आदिवासी विभाग, आदिवासी उपयोजना व एकंदरीत आदिवासींच्या असलेल्या योजनांचा विचार करता युती शासन आदिवासी विभागाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे वास्तव समोर येते.

- राज्यातील १५.२% लोकांपर्यत वीज पोहोचलेली नाही. तर ०.०९% लोक अंधारात राहतात म्हणजे त्यांच्याकडे घासलेट, तेल, सौर ऊर्जा किंवा इतर साहित्य ही नाही.
- वर्ष २०१७-१८ मध्ये १५ हजार ९४८ मेगावॅट युनिट विजेची मागणी होती. मात्र प्रत्यक्ष पुरवठा ८२ मेगावॅट भारनियमन करून भागविण्यात आली.
- या सरकारने 'राजीव गांधी जीवनदायी योजनेचे' नाव बदलून 'महात्मा फुले जीवनदायी जनआरोग्य योजना' असे केले, मात्र नाव बदलूनही सरकारने म्हणावी तशी प्रगती साधलेली नाही.
- वर्ष २०१६-१७ मध्ये या योजनेतंर्गत रु.६४३ कोटी इतका निधी खर्च झाला असून, २०१७-१८ मध्ये केवळ रु. ५२८ कोटी इतकाच निधी सरकारने खर्च केला आहे.
- महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर या सरकारची महिलांच्या योजनांप्रतीची अनास्था दिसून येते. 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना', 'माजी कन्या भाग्यश्री योजना' या योजनाची केवळ माहिती सरकारने दिलेली आहे. मात्र या योजनांसाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीचा उल्लेख सोयीस्कररित्या टाळण्यात आलेला आहे.
- शासकीय महिला आधारगृहासाठी असलेले योजनेतंर्गत २०१६-१७ मध्ये रु. ११ कोटी ८४ लाख इतका खर्च केला होता, यावर्षी त्यावर निम्म्याहूनही कमी खर्च करण्यात आला.
- महाराष्ट्र शासन वृक्ष लागवडीच्या जाहिरातीवर अमाप खर्च करून ५० कोटी झाडे लावण्याचा संकल्प मांडत आहे. आतापर्यंत लावलेल्या झाडापैकी किती झाडे जिवंत आहेत याची सकारात्मक माहिती सरकार माहिती अधिकारात देऊ शकली नाही. वृक्ष लागवडीच्या नावाखाली स्वत:ला शाबासकी देणाऱ्या शासनाने प्रत्यक्ष वास्तव मात्र मोठ्या प्रमाणात वृक्षतोडीस हातभार लावत आहे. मेट्रो, समृद्धी व इतर प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षाची तोड करीत आहे. राज्यात मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल २१५ चौ. किमी वनक्षेत्र कमी झाल्याचे दिसून येते. मोठ्या प्रमाणात वाढत असलेले प्रदूषण व दुसरीकडे घटत चाललेले वनक्षेत्र राज्याचा दृष्टीने अतिशय संवेदनशील आहे.
- 'स्वच्छ महाराष्ट्रा'चा पुकारा करणाऱ्या शासन राज्यात आजही ३ कोटी ५० लाख जनता खुल्या जागेत शौचास जात असल्याचे वास्तव समोर आलेले आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, सांडपाणी व्यवस्था याबाबतीत राज्य अजूनही अंधारात चाचपडत आहे.
- महाराष्ट्रात आजही जवळजवळ ३१ टक्के जनता बँकींग सेवेपासून वंचित आहे. 'डिजिटल भारत' व 'ऑनलाईन पेमेंट' ची भाषा करणाऱ्या शासनाला वास्तवाची जाण नाही आहे. जनधन योजनेंतर्गत राज्यात २कोटी २० लाख बँक खाती उघडण्यात आली. त्यापैकी तब्बल ५७ लाख खाती किमान शिलकीची मर्यादा नसलेली होती.
- विजेच्या बाबतीत महाराष्ट्र आजही स्वयंपूर्ण नाही. आजही ग्रामीण भागासोबतच शहरी भागातही भारनियमन करावे लागते. महाराष्ट्रात आजही तब्बल १५ टक्के जनतेपर्यंत वीज पोहोचलेली नसल्याचे केरोसिनचा वापर प्रकाशासाठी केला जातो. वीज न पोहोचलेली ग्रामीण दुर्गम भागातील वस्तीतील जनता विजेसाठी केरोसिनचा वापर करते. असे असताना गरिबांना शिधापत्रिकेवर मिळणारे केरोसिन केंद्र व राज्य शासनाकडून पुरवठा न झाल्याने ग्रामीण दुर्गम भागातील जगणे अधिक बिकट झाले आहे.

*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८)*

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान

आलेख क्र: १ **राज्य अर्थसंकल्पाचे वाढते आकारमान**




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | १५४१२४ | १७०११० | १९४०६७ | २२४०५६ | २४३०२६ | २७०७६३ | ३००३९७ | ३६७२८० |
| सुधारित अंदाज | १५२८३९ | १७२०१८ | १९७१८७ | २३०९३२ | २४७३२४ | २८२४५४ | ३२३६५२ | |
| प्रत्यक्ष खर्च | १४९२२८ | १६५४६८ | १८७९८२ | २१७७४७ | २२५२८६ | २५६९४२ | | |

*( स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०१८-१९, अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९, सुधारित अंदाज २०१७-१८)*

- वर्ष २०१८-१९चा अर्थसंकल्प रु. ३ लाख ६७ हजार २८० कोटींचा आहे. आधीच्या वर्षाच्या अर्थसंकल्पाशी म्हणजेच वर्ष २०१७-१८च्या सुधारित अंदाजाशी तुलना करता रु. ६६ हजार ८८३ कोटींनी अधिक आहे.
- वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ या कालखंडाचा विचार करता वर्ष २०११-१२, वर्ष २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५,२०१५-१६ व वर्ष २०१६-१७ मधील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा अनुक्रमे रु. ४ हजार ८९६ कोटी, रु. ४ हजार ६४२ कोटी, रु. ६ हजार ८५ कोटी, रु. ६ हजार ३०९ कोटी, रु. १७ हजार ७४० कोटी झाला होता. वर्ष २०१६-१७ च्या आकडेवारीनुसार देखील प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा रु. १३ हजार ८२१ कोटींनी कमी झाला आहे.
- वर्ष २०११-१२ ते २०१६-१७ मधील प्रत्यक्ष खर्च सुद्धा नेहमीच सुधारित अंदाजापेक्षा कमी झालेला आढळतो. वर्ष २०१७-१८ मध्येही तोच कल कायम राहणार आहे.
- **वर्ष २०१६-१७ मध्ये प्रत्यक्ष खर्च सुधारित अंदाजापेक्षा रु.२५ हजार ५१२ ने कमी झाला आहे. तेवढ्या रकमेने खर्चात कपात झाली.**
- **सुधारित अंदाजांपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी याचाच अर्थ निधीची उपलब्धता न झाल्याने खर्चाला लावलेली कात्री म्हणावी लागेल.**

# अंदाजित व प्रत्यक्ष यातील तफावतीसह
# महाराष्ट्र राज्य अर्थसंकल्प २०१४-१५ व २०१५-१६

*तक्ता:क्र. १* *रु. कोटीत*

| अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रकमा | तफावत वाढ वा घट | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रकमा | तफावत वाढ वा घट |
|---|---|---|---|---|---|
| महसुली जमा | | | | | |
| २०१५-१६ | | | २०१६-१७ | | |
| १९८२३०.५० | १८५०३५.६८ | -१३१९४.८२ | २२०८१०.०५ | २०४६९३.१४ | -१६११६.९१ |
| महसुली खर्च | | | | | |
| २०१९८७.९० | १९०३७४.०५ | -११६१३.८५ | २२४४५४.६१ | २१३२२८.७३ | -११२२५.८८ |
| महसुली तूट | | | | | |
| ३७५७.४० | ५३३८.३७ | १५८०.९७ | ३६४४.५५ | ८५३५.५९ | ४८९१.०४ |
| एकूण खर्च | | | | | |
| २३००६१.९६ | २१३२०८.४० | -१६८५३.५६ | २५६९९२.१५ | २४५०३४.७२ | -११९५७.४३ |
| योजनांतर्गत | | | | | |
| ७१६३७.२८ | ५६७००.९७ | १४९३६.३१ | ७४४०२.८६ | — | — |
| योजनेतर | | | | | |
| १५८४२४.६८ | १५७५८०.८७ | -८४३८१.०० | १८२५८९.२९ | — | — |
| राजकोषीय तूट | | | | | |
| ३०७३३.०० | २८३६४.१५ | २३६८.८५ | ३५०३१.३८ | ३८५१६.०० | ३५६४.६२ |

**राज्यावरील एकूण कर्ज**

| २०१५-१६(प्र.) | २०१६-१७(प्र.) | २०१७-१८(सु) | २०१८-१९(अं) |
|---|---|---|---|
| ३२४२०२.०० | ३६४८१९.०० | ४०६८११.०० | ४६१८०६.९५ |
| वेतन | | | |
| ६८४५१.०० | ७२०७५.०० | ८३८१४.०० | १०२६६८.०० |
| निवृत्ती वेतन | | | |
| १८६४३.०० | २१७६०.०० | २४०२०.०० | २७३७८.०० |
| कर्जावरील व्याज | | | |
| २५७७१.०० | २८५३२.०० | ३३५१८.०० | ३४३८५.०० |
| महसुली जमेशी वेतन/निवृत्ती वेतन/व्याज यांची टक्केवारी | | | |
| ६१.०० | ५९.७८ | ५४.८७ | ५७.५० |

## महसुली जमा, महसुली खर्च आणि महसुली तूट याचे टिपण

महसुली जमा, महसुली खर्च आणि महसुली तूट याचा २०१८-१९चा अंदाज आणि मागील तीन वर्षांचा अनुभव पाहता, महसुली जमा कमी होणार. त्याचप्रमाणे अंदाजापेक्षा खर्चही कमी होणार आणि त्याचवेळी अंदाजापेक्षा तूटही वाढणार. त्यामुळे प्रत्यक्षात दिसणारी तूट आणि खर्च केला असता येणारी तूट ही पाहता तुटीचे प्रमाण कितीतरी अधिक होईल. उदा. महसुली जमेच्या अंदाजापेक्षा मागील वर्षांचा कल पाहता महसुली जमा रु. १६ हजार कोटीने कमी जमा होईल तसेच महसुली खर्चही रु. ११ हजार कोटीने कमी होईल आणि महसुली तूट मात्र रु. १६ हजार कोटीने वाढलेली असेल.

याचा अर्थ मांडला गेलेल्या अर्थसंकल्पाच्या आकडेवारीची व त्याच्या टक्केवारीची विविध विभागाना दिलेला अर्थसंकल्पीय अंदाज आपण कितीही चर्चा केली तरी वर्ष संपता आजचे दिसणारे अर्थसंकल्पाचे स्वरुप पूर्णत: भिन्न झालेले असेल. नियोजनाप्रमाणे खर्च होणार नाही. आणि आर्थिक शिस्तदेखील कितीही प्रयत्न केले तरी अर्थमंत्री लावू शकणार नाहीत हे यातील वास्तव आहे.

वर्ष २०१८-१९ मध्ये महसुली जमा रु. २ लाख ८५ हजार ९६७ कोटी ९६ लाख असेल असा अंदाज व्यक्त केला आहे. मागील अनुभव लक्षात घेता हा अंदाज अधिकचा केला असे म्हणता येईल. २०१६-१७ मध्ये अंदाज रु. २ लाख २० हजार ८१० कोटी ५ लाख इतका होता. प्रत्यक्षात रु. २ लाख ४ हजार ६९३ कोटी १४ लाख इतका जमा झाला. म्हणजेच रु. १६ हजार ११६ कोटी ९१ लाख इतका अंदाजापेक्षा कमी जमा झाला.

**डॉ. रंगराजन समितीने अर्थसंकल्पातील योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याची शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासनाने वर्ष २०१७-१८च्या अर्थसंकल्पापासून योजनांतर्गत व योजनेतर विभाजन दाखविणे बंद केले आहे.**


**आपले म्हणणे केवळ सत्याचे असून पुरेसे नाही,**
**सत्यामागे संघटनेचे सामर्थ्य पाहिजे !**

**- स्व. एसेम. जोशी**

# राजकोषीय स्थैर्य

महसुली व राजकोषीय तुटीचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण हे शासनाच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. राजकोषीय उत्तरदायित्त्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन कायद्यानुसार शासनास महसुली तूट २००८-०९ पर्यंत शून्यावर व राजकोषीय तूट राज्य स्थूल उत्पन्नाच्या प्रमाणात ३ टक्क्यांवर आणावयाची होती. वर्ष २००६-०७ पासून अनेक खटपटी करून शासनाने हे उद्दिष्ट साध्य केले होते.

आलेख क्र: २ **तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण**




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राजकोषीय तूट | १.७ | ०.९ | १.७ | १.८ | १.४ | १.७ | १.९ | १.८ |
| महसुली तूट | ०.२ | -०.३ | ०.३ | ०.७ | ०.३ | ०.४ | ०.६ | ०.६ |

*( स्त्रोत : वित्तविषयक विवरणपत्र, टीप : अर्थसंकल्प २०१८-१९, अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९, सुधारित अंदाज २०१७-१८)*

**वर्ष २०१७-१८ चे सुधारित आणि वर्ष २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहता महसुली तूट अनुक्रमे ०.५९ व ०.५५ इतकी राहणार असून राजकोषीय तूट अनुक्रमे १.८५ व १.८१ इतकी असणार असे अंदाज दिलेले आहेत.**

## राजकोषीय तूट, महसुली तूट व स्थूल राज्य उत्पन्नातील बदलते स्वरुप

तक्ता क्र.२ (रु. कोटीत)

| वर्ष | राजकोषीय तूट (प्रमाण) | महसुली तूट (प्रमाण) | स्थूल राज्य उत्पन्न |
|---|---|---|---|
| २००८-०९ | १४०१७ (१.९) | -५५७७(-०.७) | ७,५३,९६९ |
| २००९-१० | २६१८१ (३.१) | ८००६ (०.९) | ८,५५,७५१ |
| २०१०-११ | १८८५७ (१.८) | ५९१ (०.१) | १०,४९,१५० |
| २०११-१२ | १९९६९ (१.७) | २२६८ (०.२) | १२,७५,९४८ |
| २०१२-१३ | १३७३९ (१.०) | -४२११ (-०.३) | १४,५४,६१२ |
| २०१३-१४ | २६०१८ (१.७) | ५०८१ (०.३) | १६,४६,०४३ |
| २०१४-१५ | ३१८२७ (१.८) | १२१३८ (०.७) | १७,७३,७४४ |
| २०१५-१६ | २८३८१ (१.४) | ५३३८ (०.३) | २०,०१,२२३ |
| २०१६-१७ | ३८६१६ (१.७) | ८५३६ (०.४) | २२,५७,०३२ |
| २०१७-१८ | ४६२०१(१.९) | १४८४३ (०.६) | २४,९६,५०५ |
| २०१८-१९ | ५०५८६ (१.८) | १५३७५ (०.६) | २७,९६,०८६ |

*(कंसातील आकडे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण दर्शवितात. तक्ता व आलेख यांचा स्त्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१८-१९, अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९ व सुधारित अंदाज २०१७-१८)*

# एकूण खर्चामध्ये महसुली - भांडवली व
# विकास - विकासेतर खर्चाचा तपशील

*तक्ता क्र: ३* — *रु. कोटीत*

| वर्ष | महसुली खर्च | | | भांडवली खर्च | | | एकूण खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विकास | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर | एकूण | विकास खर्च | विकासेतर खर्च | एकूण |
| २००८-०९ | ४९१०९.२१ | २६५८४.७१ | ७५६९३.९२ | २०८०३.८० | ४२१४.५१ | २५०१८.३१ | ६९९१३.०१ | ३०७०९.२२ | १००६२२.२३ |
| २००९-१० | ६२८४५.०१ | ३२०७०.९६ | ९४९१५.९७ | १८६८९.७४ | ४१७५.३९ | २२८६५.१३ | ८१५३४.७४ | ३६२४६.३५ | ११७७८१.०९ |
| २०१०-११ | ६८७५५.१५ | ३७७०४.२३ | १०६४५९.३८ | १८९२२.४५ | ५६२३.६१ | २४५४६.०५ | ८७६७७.५९ | ४३३२७.८३ | १३१००५.४३ |
| २०११-१२ | ८०७०१.३१ | ४२८५२.८८ | १२३५५४.१९ | १८७१५.८२ | ६९५८.३५ | २५६७४.१८ | ९९४१७.१४ | ४९८११.२३ | १४९२२८.३७ |
| २०१२-१३ | ९१०७०.३१ | ४७६६५.६७ | १३८७३५.९८ | १८८१३.९२ | ७९१९.०२ | २६७३२.९४ | १०९८८४.२३ | ५५५८४.६८ | १६५४६८.९२ |
| २०१३-१४ | १००९२३.१५ | ५३९७९.२७ | १५४९०२.४२ | २१६६५.५४ | ११४१४.१९ | ३३०७९.७३ | १२२५८८.६९ | ६५३९३.४६ | १८७९८२.१५ |
| २०१४-१५ | ११७०६७.३५ | ६०४८५.७७ | १७७५५३.१२ | २०६६४.०१ | १९५३०.६८ | ४०१९४.६९ | १३७७३१.३६ | ८००१६.४५ | २१७७४७.८१ |
| २०१५-१६ | १२६००४.२९ | ६४३६९.७६ | १९०३७४.०५ | २३९०७.७९ | ११००५.१० | ३४९१२.८९ | १४९९१२.०८ | ७५३७४.८६ | २२५२८६.९४ |
| २०१६-१७ | १४१६१९.३० | ७१६०९.४३ | २१३२२८.७३ | ३१८०५.९९ | ११८८६.८९ | ४३६९२.८८ | १७३४२५.२९ | ८३४९३.३२ | २५६९२१.६१ |
| २०१७-१८ | १९१३५०.०९ | ८१०९८.१७ | २७२४४८.२६ | ३३६१४.६९ | १७५८९.२७ | ५१२०३.९६ | २२४९६४.७८ | ९८६८७.४४ | ३२३६५२.२२ |
| २०१८-१९ | २०२२९७.११ | ९९०४५.०० | ३०१३४२.८६ | ३७४७६.५० | २८४६१.५१ | ६५९३८.०१ | २३९७७३.६१ | १२७५०७.२६ | ३६७२८०.८७ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१८-१९  टीप : सुधारित अंदाज २०१७-१८,  अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९*

- **राज्याचा वर्ष २०१८-१९ मध्ये रु. ३ लाख ६७ हजार २८० कोटींचा एकूण अंदाजित खर्च होईल असे शासन सांगत असून त्यामध्ये रु. ३ लाख १ हजार ३४२ कोटींचा महसूली खर्च असून रु. ६५ हजार ९३८ कोटींचा भांडवली खर्च अंदाजित केला आहे.**
- **राज्याचा वर्ष २०१६-१७ मधील प्रत्यक्ष खर्च पाहिला असता एकूण खर्च रु.२ लाख ५६ हजार ९२१ कोटी असून त्यामध्ये रु. ४३ हजार ६९२ कोटींचा भांडवली केलेला खर्च आहे व रु. २ लाख १३ हजार २२८ कोटींचा महसूली खर्च केलेला आहे.**
- **राज्याने वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण खर्च रु. २ लाख ५६ हजार ९२१ कोटी केला असून त्यामध्ये रु.१ लाख ४१ हजार ६१९ कोटी विकास खर्च व रु. ७१ हजार ६०९ कोटी विकासेतर खर्च आहे.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या ३२ टक्के खर्च वेतनावर

## राज्यातील कर्मचाऱ्यांची संख्या व त्यांच्या वेतनावरील खर्च

*तक्ता क्र: ४*

| कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग | कर्मचाऱ्यांची संख्या (२०१५-१६) | वेतनावरील खर्च (२०१५-१६) | कर्मचाऱ्यांची संख्या (२०१६-१७) | वेतनावरील खर्च (२०१६-१७) | वर्षभरात कर्मचाऱ्यांमधील झालेली घट |
|---|---|---|---|---|---|
| शासन | ५,७१,०४९ | २७,६८५.६३ | ५,५३,१२८ | २६,११९.७८ | १७,९२१ |
| शासकीय अनुदान प्राप्त संस्था | ९,१०,९३२ | ४१,२५५.६७ | ८,१५,९७८ | ४३,८२८.९६ | ९४,९५४ |
| सार्वजनिक क्षेत्रातील युनिटे | २,४५,८४० | ११,४३०.२० | २,२७,५५० | ११,८२६.१२ | १८,२९० |
| **एकूण** | **१७,२७,८२१** | **८०,३७१.५०** | **१,५९,६६,५६** | **८१,७७४.८६** | **१,३१,१६५** |

*स्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण वर्ष २०१८-१९*

- **वर्ष २०१५-१६ मध्ये राज्याचा एकूण अर्थसंकल्पात झालेला खर्च रु. २ लाख २५ हजार २८६ कोटी आहे. मात्र त्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर तब्बल रु. ८० हजार ३७१ कोटी ५० लाख इतका खर्च करण्यात आला होता. तर २०१६-१७ मध्ये रु. २ लाख ५७ हजार २९२ कोटी ९९ लाख एवढा खर्च झाला आहे. मात्र त्यातील वेतनावर झालेला खर्च रु. ८१ हजार ७७४ कोटी ८६ लाख एवढा (३२ टक्के) आहे.**
- **वर्ष २०१५-१६च्या तुलनेत वर्ष २०१६-१७ मध्ये १ लाख ३१ हजार १६५ शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदांमध्ये घट झाली आहे. त्याचवेळेला राज्यात १० लाख ५५ हजार ५०६ पदे मंजूर असून त्यापैकी १ लाख ५७ हजार ९२३ पदे रिक्त आहेत. तसेच पदे भरण्यात रिक्त राहिली तर अंमलबजावणीही होणार नाही.**

**वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधिल खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिणाम होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, ही चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. जेणे करून राज्याच्या आर्थिक वाढीस हातभार लागेल.**

## राज्य शासनाने रु.८० हजार २५१ कोटी ७१ लाखाच्या महसुलावर पाणी सोडले

### निर्विवाद रकमांची वसुली ही विवादास्पद!

*तक्ता क्र.५* *रु. कोटीत*

| तपशील | २०१५-१६ | २०१६-१७ | वाढ |
|---|---|---|---|
| कर महसुलातील वसूल न केलेल्या विवादास्पद रकमा | ५११७०.५५ | ५७३३८.९७ | ६१६८.४२ |
| कर महसुलातील वसूल न केलेल्या निर्विवाद रकमा | २१६३०.०६ | १९७९७.०३ | -१८३३.०३ |
| वसूल न केलेला करेतर महसूल | ३०७४.२८ | ३११५.७१ | ४१.४३ |
| **एकूण** | ७५८७४.८९ | ८०२५१.७१ | ४३७६.८२ |

*(स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१८-१९)*

- वर्ष २०१५-१६ पर्यंत वेगवेगळ्या करातून जमा होणारा कर त्याबाबतच्या विवादास्पद रकमा रु. ५१ हजार १७० कोटी ५५ लाख इतक्या होत्या व निर्विवाद रकमा या रु. २१ हजार ६३० कोटी ६ लाखांच्या होत्या. वर्ष २०१६-१७ मध्ये त्यात वाढ होऊन त्या अनुक्रमे रु. ५७ हजार ३३८ कोटी ९७ लाख व रु. १९ हजार ७९७ कोटी ३ लाख इतक्या झाल्या आहेत.
- वर्ष २०१५-१६ मध्ये शासनाने रु. ७५ हजार ८७४ कोटी ८९ लाखांचा कर व करेतर महसूल जमा केला नव्हता उलट त्यात ५.७६ टक्क्यांनी वाढ होऊन तो वर्ष २०१६-१७ मध्ये ८० हजार २५१ कोटी ७१ लाख इतका झाला आहे.

### शासनाने दिलेली हमी

शासनाने दिलेली हमी हे देखील शासनाचे दायित्व असते. अशी हमी कर्ज स्वरुपात असते. २०१६-१७ अखेर अदत्त असलेली रक्कम रु. ७ हजार ३०५ कोटी ७० लाख इतकी असून हमीच्या एकूण नोंदी ५५६ आहेत.

### शासनाची वेगवेगळ्या प्रकारची दायित्वे

केंद्राकडून घेतलेली कर्जे, अल्पबचत निधीला विक्री केलेले कर्जरोखे, वित्तीय संस्था, बँका यांच्याकडून घेतलेली कर्जे, बाजारातून घेतलेली कर्जे, रिझर्व्ह बँकेकडून घेतलेला ओव्हर ड्राफ्ट, भविष्यनिर्वाह निधी, राखीव निधी, अर्थसंकल्पात अंतर्भूत नसलेली कर्जे ही दायित्व शासनाची येतात. २०१६-१७च्या वर्ष अखेरीस रु.३ लाख ६४ हजार ८१८ कोटी ८० लाख इतके दायित्व होते. तर २०१७-१८ ला रु. ४ लाख ६८ हजार ११ कोटी इतके दायित्व असेल असे सुधारित अंदाज केले आहेत.

### अदत्त संकीर्ण दायित्वे


२०१६-१७ अखेर प्रमुख बांधकामे कंत्राटी व पुरवठा यांचे दायित्व रु. ४ हजार १७८ कोटी ४८ लाख तर पंचायत राज संस्थांसह विविध संस्थांना देय असलेल्या अनुदानाची थकबाकी रु. १०३ कोटी ७० लाख इतकी आहे जे शासनाचे देणे आहे.

*- स्त्रोत: मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण, २०१८-१९*

# राज्यावरील व्याजासहित कर्ज

## राज्यावरील कर्ज रु. ४ लाख ९६ हजार १९२ कोटी!

*आलेख क्र: ३* *( रु. कोटीत)*




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | २२५९७६ | २४६६९२ | २६९३५५ | २९४२६१ | ३२०२१० | ३९३३५१ | ४४०३२९ | ४९६१९२ |

*स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प - २०१८-१९* *टीप : कर्जाच्या आकडेवारीमध्ये व्याजाची आकडेवारी घेण्यात आली आहे*

- **राज्याचा कर्जाचा आलेख हा सातत्याने वाढताना दिसतो. वर्ष २०११-१२ ते वर्ष २०१८-१९ मध्ये व्याजासहित कर्ज पहाता राज्याच्या डोक्यावर वर्षाला सरासरी रु. ३ लाख ३६ हजार २९४ कोटी इतके आहे.**

- **वर्ष २०१८ मध्ये राज्याचे व्याजासहित कर्ज रु. ४ लाख ९६ हजार १९२ कोटी इतके अंदाजित करण्यात आले आहे.**


- **या दायित्वामध्ये शासनाने विकासासाठी केलेले अन्य करार अंतर्भूत नाहीत. मान. मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले अंदाज लक्षात घेतले तर ती रक्कम रु. ५ लाख ९७ हजार ३१९ कोटी इतकी होते. हा निधी राज्याच्या तिजोरीतून गेला नाही तरी ते दायित्व राज्याच्या जनतेवर प्रत्यक्ष येणारच आहे.**

*स्रोत : महाराष्ट्र शासन प्रकाशित 'कथा परिवर्तनाची. . . दर्शन समृद्धीचे. . . बदलत्या महाराष्ट्राचे. . .'*

# राज्यावरील सरासरी कर्जाचे प्रमाण
# स्थूल राज्य उत्पन्नाच्या १९ टक्के आहे

## राज्यावरील वाढत्या कर्जाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण

आलेख क्र: ४




| | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रमाण | २०.७१ | २०.१० | १९.२४ | १७.७५ | १७.४८ | १७.४२ | १७.६३ | १७.७४ |

*(स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प, २०१८-१९, अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९, सुधारित अंदाज २०१७-१८)*

- राज्यावरील कर्ज व व्याजाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी असणारे प्रमाण पाहता वर्ष २०११-१२ ते २०१८-१९ या कालावधीतील वर्ष २०११-१२ मध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच २०.७१ टक्के इतके होते.
- वर्ष २०१६-१७ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नामध्ये कर्ज व व्याजाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजेच १७.४२ टक्के इतके उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**राज्य शासनाचे कर्जावरील व्याजाचे महसुली जमेशी प्रमाण १० टक्केच्या आत ठेवणे आवश्यक आहे. परंतु वर्ष २०१६-१७ मध्ये महसुली जमेशी प्रमाण १३.९३ टक्के होते.**

# राज्यातील प्रत्येक नागरिकावर
# ४४ हजार १४५ रुपयांचे व्याजासह कर्ज!

### राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज

तक्ता क्र: ६ (रु. कोटीत)

| वर्ष | राज्यावरील कर्ज व स्थूल राज्य उत्पन्न | | | | दरडोई कर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| | कर्ज | व्याज | एकूण कर्ज | स्थूल राज्य उत्पन्न | |
| २००८-०९ | १,६०,६७३ | १३,०२७ | १,७३,७०० | ७,५३,९६९ | १५,८७७ |
| २००९-१० | १,८१,४४७ | १४,८३८ | १,९६,२८५ | ८,५५,७५१ | १७,८९२ |
| २०१०-११ | २,०३,०९७ | १५,६४८ | २,१८,७४५ | १०,४९,१५० | १९,४६१ |
| २०११-१२ | २,२५,९७६ | १७,५०५ | २,४३,४८१ | ११,७०,१२१ | २१,६६२ |
| २०१२-१३ | २,४६,६९२ | १९,०७६ | २,६५,७६८ | १३,२२,२२२ | २३,६४५ |
| २०१३-१४ | २,६९,३५५ | २१,२०७ | २,९०,५६२ | १५,१०,१३२ | २५,८५० |
| २०१४-१५ | २,९४,२६१ | २३,९६५ | ३,१८,२२६ | १७,९२,१२२ | २८,३११ |
| २०१५-१६ | ३,२४,२०२ | २५,७७१ | ३,४९,९७३ | २०,०१,२२३ | ३१,१३६ |
| २०१६-१७ | ३,६४,८१९ | २८,५३२ | ३,९३,३५१ | २२,५७,०३२ | ३४,९९५ |
| २०१७-१८ | ४,०६,८११ | ३३,५१८ | ४,४०,३२९ | २४,९६,५०५ | ३९,१७५ |
| २०१८-१९ | ४,६१,८०७ | ३४,३८५ | ४,९६,१९२ | २७,९६,०८६ | ४४,१४५ |

*स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१८-१९* *टीप : अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९, सुधारित अंदाज २०१७-१८)*


*(टीप : राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी)*

- **राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. युती शासनाकडून आघाडी शासनाच्या हाती सत्ता आली त्यावेळी राज्यावरील कर्जाचा बोजा रु. ४२ हजार ६६६ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या १७.२ टक्के) होता. वर्ष २००४-०५मध्ये आघाडी शासन दुसऱ्यांदा निवडून आले त्यावेळी हा बोजा रु. १ लाख ९ हजार १६७ कोटी (राज्य स्थूल उत्पन्नाच्या २८.३ टक्के) एवढा वाढला होता. त्यावरील व्याज रु. १० हजार २५८ कोटी मिळून एकूण कर्ज रु. १ लाख १९ हजार ४२५ कोटी -इतके झाले होते. आता युती शासनाकडे पुन्हा राज्याची धुरा आलेली असताना राज्यावरील व्याजासहित कर्ज हे रु. ४ लाख ९६ हजार १९२ कोटींचे आहे.**
- **राज्यातील प्रत्येक व्यक्तीवर असलेला कर्जाचा भार हा जवळ जवळ ४४ हजार १४५ रुपये इतका आहे!**

# नंदुरबार, मुंबई या जिल्ह्यांमधील आर्थिक दरी वाढली !

## राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत राज्याचा असमतोल विकास

आलेख क्र. ५




*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१७-१८)*

- **सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु.७८,५३१), गडचिरोली (रु.७८,८६३), वाशिम (रु. ७९,९८५), असून पुणे (रु. २,२२,००८), ठाणे (रु. २,३६,१९९) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रुपये २ लाख ७९ हजार ९६५ इतके आहे.**
- **मुंबई, ठाणे व पुणे यासारख्या महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण दुर्गम जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी दाखविते.**

### स्थूल राज्य उत्पन्न, महसुली व राजकोषीय तूट:

- **वर्ष २०१८-१९चे राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न हे रु. २७ लाख ९६ हजार ८६ कोटी इतके अंदाजित असून राज्य स्थूल उत्पन्नाशी महसुली तुटीचे प्रमाण हे ०.५५ टक्के आहे तर राजकोषीय तुटीचे प्रमाण हे १.८१ टक्के इतके आहे.**
- **वर्ष २०१८-१९ची महसूली तूट रु. १५ हजार ३७५ कोटी तर राजकोषीय तूट ही रु. ५० हजार ५८६ कोटी इतकी आहे.**

## कर्ज व व्याज:

- वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यावर एकूण कर्ज (व्याजासहित) रु. ३ लाख ९३ हजार ३५१ कोटींचे होते ते वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ४ लाख ४० हजार ३२९ कोटी इतके वाढले. राज्यावरील कर्जाचा बोजा हा वाढतानाच दिसतोय कारण आता वर्ष २०१८-१९मधील अंदाज पाहता ते कर्ज व्याजासहित रु. ४ लाख ९६ हजार १९२ कोटींवर आले आहे.
- राज्याचे कर्जावरील व्याज देखील वाढत आहे ते वर्ष २०१६-१७ मध्ये रु. २८ हजार ५३२ कोटी होते ते वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ३३ हजार ५१८ कोटींचे झाले होते व २०१८-१९चे अंदाज पाहिले असता रु. ३४ हजार ३८५ कोटींचे व्याज फेडावे लागणार आहे.
- राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न वर्ष २०१८-१९ मध्ये रु. २७ लाख ९६ हजार ८६ कोटींचे असले तरी त्यात १६.५२% कर्ज व १.१२% व्याज आहे.

## महसुली जमा व महसुली खर्च

तक्ता क्र.७ **महसूली जमा व खर्चाचे विवरण** (रु. कोटीत)

| बाब | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|
| महसुली जमा | १,६५,४१५ | १,८५,०३६ | २०४६९३ | २५७६०५ | २८५९६८ |
| महसुली खर्च | १,७७,५५३ | १,९०,३७४ | २१३२२९ | २७२४४८ | ३०१३४३ |
| वेतनावरील खर्च | ६२,१२३ | ६८,४५१ | ७२०७५ | ८३८१४ | १०२६६८ |
| निवृत्तीवेतनावरील खर्च | १७,३८५ | १८,६४३ | २१७६० | २४०२० | २७३७८ |
| व्याज | २३,९६५ | २५,७७१ | २८५३२ | ३३५१८ | ३४३८५ |
| वेतन + निवृत्तीवेतन + व्याज | १,०३,४७३ | १,१२,८६५ | १२३७६ | १४१३५२ | १६४४३१ |
| महसुली आधिक्य (+) तूट(–) | -१२,१३८ | -५,३३८ | - ८५३६ | -१४८४३ | -१५३७५ |

*(स्रोत: संक्षिप्त अर्थसंकल्प २०१८-१९, अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९, सुधारित अंदाज वर्ष २०१७-१८)*

- महसुली जमा व खर्च पाहिले असता राज्य शासनाने वर्ष २०१८-१९ मध्ये महसुली खर्च रु. ३ लाख १ हजार ३४३ कोटी इतका होईल व रु. २ लाख ८५ हजार ९६८ कोटींचा महसूल जमा होईल असे अंदाज वर्तविले आहेत.
- वर्ष २०१६-१७च्या प्रत्यक्ष रकमा पाहता राज्य शासनाचा महसुली खर्च हा जमेपेक्षा ४.१७ टक्के जास्त आहे.
- महसुली जमेपैकी शंभरातील रु. ३५.२१ वेतनावर, रु. १०.६३ निवृत्ती वेतनावर, तर रु. १३.९४ व्याजावर खर्च होतात. म्हणजे राज्यात जमा झालेल्या एकूण महसुली जमेपैकी १०० तील रु. ५९.७८ केवळ सरकार चालविण्यासाठी वेतन, निवृत्ती वेतन आणि व्याज यावर खर्च होतो. त्यांच्या वाहनांचा खर्च व भत्ते, कार्यालयाची देखभाल व दुरुस्ती हा खर्च या खेरीज होत असतो.

# ४८ हजार १०७ कोटींचा खर्च कमी

## १००० कोटी रुपयांपेक्षा कमी खर्च

तक्ता क्र.८ *(रु. कोटीत)*

| अक्र | अनुदान क्र. | अनुदानाचे नाव | एकूण तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | बी ०१ | पोलीस प्रशासन | ११७६२.१० | १००४६.२१ | १७१५.८९ | १४.५९ |
| २. | ई०२ | सामान्य शिक्षण | ३९१२१.६५ | ३५८०४.०८ | ३३१७.५७ | ८.४८ |
| ३. | एफ०२ | नगरविकास व इतर प्रगत सेवा | ७५०२.४८ | ६३५०.५३ | ११५१.९५ | १५.३५ |
| ४. | जी ०२ | इतर राजकोषीय आणि संकीर्ण सेवा | ३६११.५३ | ११९.७४ | ३४९१.७९ | ९६.६८ |
| ५. | जी ०६ | निवृत्ती वेतन | १६४५४.९२ | १५३१५.८९ | ११३९.३० | ६.९२ |
| ६. | एल०३ | ग्राम विकास कार्यक्रम | ५५८२.३८ | ४२७४.०५ | १३०८.३३ | २३.४४ |
| ७. | एन ०३ | अनु. जाती-जमाती, इमाव आणि अल्पसंख्यांकांचे कल्याण | १०२५८.१० | ८०६१.६७ | २१९६.४३ | २१.४१ |
| ८. | ओ ०४ | इतर ग्रामविकास कार्यक्रम | ७७४४.२० | ०.०६ | ७७४४.१४ | १००.०० |
| ९. | आर ०१ | वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य | ८१४९.४४ | ६७४१.९१ | १४०७.५३ | १७.२७ |
| १०. | टी ५ | जनजाती क्षेत्र विकास उपयोजनेवरील महसुली खर्च | ५३४७.३७ | ३९७३.३३ | १३७४.०४ | २५.७० |
| ११. | वाय ०२ | पाणी पुरवठा आणि स्वच्छता | २९५५.०५ | १५०९.७४ | ११४४५.३१ | ४८.९१ |
| १२. | जी ०३ | कर्ज व व्याज | २७१३९.४५ | २५२१६.३३ | १९२३.१२ | ७.०९ |
| १३. | एल०७ | ग्रामविकासावरील भांडवली खर्च | ३००१.६० | १३३६.७७ | १६६४.८३ | ५५.४६ |
| १४. | आय०५ | पाटबंधाऱ्यांवरील भांडवली खर्च | १०३९५.८७ | ७४०२.१२ | २९९३.७५ | २८.८० |
| १५. | एम ०४ | अन्नावरील भांडवली खर्च | ५२४७.३८ | ४०९२.८१ | ११५४.५७ | २२.०० |
| १६. | एन ०४ | सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | १४२९.५१ | २२७.१० | १२०२.४१ | ८४.११ |
| १७. | जी ०९ | आंतरराज्यीय तडजोड - लोककर्ज | १२२९४.०५ | ९४१७.२१ | २८७६.८४ | २३.४० |
| | | **एकूण** | **१७७९९७.०८** | **१३९८८९.५५** | **४८१०७.८०** | **२७.०२** |

*स्रोत : विनियोजन लेख २०१५-१६*

- **१००० कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत करणारे पोलीस, शिक्षण, नगर विकास, ग्राम विकास, सामाजिक न्याय, आरोग्य, आदिवासी, पाटबंधारे व पाणी पुरवठा, अन्न पुरवठा या विभागांसाठी वेगवेगळ्या मागण्यांतर्गत रु. १ लाख ७७ हजार ९९७ कोटी ८ लाखांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु. १ लाख ३९ हजार ८८९ कोटी ५५ लाख खर्च झाला तर रु. ४८ हजार १०७ कोटी ८० लाखांचा कमी खर्च करण्यात आला आहे. हे प्रमाण २७.०२ टक्के आहे**

# शासकीय कंपन्यांचा संचित तोटा पोहोचला २५ हजार ६४० कोटींवर

तक्ता क्र.९ *(रु. कोटीत)*

| अक्र | कंपनीचे नाव आणि क्षेत्र | या वर्षासाठीचा निव्वळ तोटा | तोट्यातील कंपन्यांचा एकूण संचयी तोटा |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित | ५.८२ | २३५.३८ |
| २. | अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित | — | ३६.६० |
| २. | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित | ६.४० | १२४.६४ |
| ३. | वसंतराव नाईक विभज विकास महामंडळ मर्यादित | ४९.७८ | ३६.९५ |
| ४. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित | — | ३२९९.२० |
| ५. | मिहान इंडिया लिमिटेड | १३.१६ | ४२.०६ |
| ६. | एमएसईबी सूत्रधार कंपनी लिमिटेड | १३७.८५ | ४११०.४६ |
| ७. | महाराष्ट्र विद्युत विकास महामंडळ मर्यादित | ०.२५ | १०१२.७३ |
| ८. | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित | ४६२.१५ | ७०८७.१३ |
| ९. | महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित | ८७४२.०४ | ६५८७.३१ |
| १०. | महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ मर्यादित | ३९१.०१ | १६८५.३४ |
| ११. | महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स  महामंडळ मर्यादित | १९.६८ | ३१५.१६ |
| १२. | महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित | ४०.२४ | १००४.०३ |
| १३. | प्रताप कताई, विणाई आणि उत्पादन कंपनी मर्यादित | ०.०१ | ६३.८८ |
| | **एकूण** | **९८६८.३९** | **२५६४०.८७** |

*स्रोत : प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा) III, महाराष्ट्र, मुंबई*

- **३१ मार्च २०१६ अखेर कार्यरत व कार्यरत नसलेल्या कंपन्यांचा निव्वळ तोटा रु.९ हजार ८६८ कोटी ३९ लाख होता. तर या तोट्यातील कंपन्यांचा संचित तोटा रु. २५ हजार ६४० कोटी ८७ लाख होता.**
- **महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित या कंपनीचा संचित तोटा सर्वात जास्त म्हणजे रु. ७ हजार ८७ कोटी होता.**
- **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित या कंपनीचा निव्वळ तोटा सर्वात जास्त म्हणजे रु. ८ हजार ४७२ कोटी होता.**

**अकार्यरत शासकीय कंपन्या म्हणजे पांढरे हत्ती असून ते सरकारने पोसण्यापेक्षा त्यांचे पुनरुज्जीवन करावे अथवा अशा अकार्यरत शासकीय कंपन्या बंद करण्यात याव्यात.**

# वर्ष २०१५-१६च्या शेवटच्या तीन महिन्यांतील झालेली खर्चाची घाई

## त्यातल्या मार्च महिन्यांत ५ हजार ६६४ कोटी खर्च  तर शेवटच्या ३ महिन्यात ६ हजार ६६ कोटींचा खर्च

तक्ता क्र. १० (रु. कोटीत)

| अक्र | अनुदान क्रमांक | मुख्य शीर्ष | वर्षाचा एकूण खर्च | वर्षातील शेवटच्या तिमाहीतील खर्च | | मार्च २०१६ मधील खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी | रक्कम | एकूण खर्चाची टक्केवारी |
| १. | एफ ०२ | ३०५४- रस्ते व पूल | ४५०.०९ | ४५०.०९ | १००.०० | ४५०.०९ | १००.०० |
| २. | बी १० | ४०५५- पोलिसांवरील भांडवली खर्च | ४१९.४९ | ४१९.४९ | १००.०० | ४१९.४९ | १००.०० |
| ३. | क्यू ०३ | २२१६- गृहनिर्माण | २०८.५० | १६३.८१ | ७८.५७ | १६१.०६ | ७७.२५ |
| ४. | एन ०४ | ४२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय व अल्पसंख्यांक यावरील भांडवली खर्च | २०६.५३ | २०१.०५ | ९७.३५ | १५८.९२ | ७६.९५ |
| ५. | एफ ०५ | २२१७- नगर विकासावरील भांडवली खर्च | ४२७.३५ | ३४२.९० | ८०.२४ | ३२५.९१ | ७६.२६ |
| ६. | झेडई०१ | २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण | २७५.४० | २०३.४७ | ७३.८८ | १९६.५० | ७१.३५ |
| ७. | टी ०६ | ५०५४- रस्ते व पूल | ४०७.१५ | ३१६.९९ | ७७.८० | २८५.८२ | ७०.२० |
| ८. | बी ११ | ७६१०- सरकारी कर्मचाऱ्यांना कर्ज | २९३.२६ | २१०.०६ | ७१.६३ | २००.४८ | ६८.३६ |
| ९. | ओ१० | ४५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च | ६९२.९३ | ५५२.६८ | ७९.७६ | ४३७.९३ | ६३.२० |
| १०. | टी ०५ | २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण | २१०८.७४ | १४७२.४६ | ६९.८३ | १२९५.९५ | ६१.४६ |
| ११. | टी ०६ | ४२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्गीय व अल्पसंख्यांक यांवरील भांडवली खर्च | ५०२.२४ | ३६४.०८ | ७२.४९ | ३०४.४४ | ६०.६२ |
| १२. | एच०३ | २२१६- गृहनिर्माण | ३२१.९८ | २१६.६२ | ६७.२८ | १८६.८९ | ५८.०७ |
| १३. | एल ०७ | ४४०२- मृद व जलसंधारणावरील भांडवली खर्च | ११०५.१२ | ६४०.१७ | ५७.९३ | ६२०.४० | ५६.१४ |
| १४. | ए ०२ | २०१५- निवडणुका | ३२८.१८ | २१५.९४ | ६५.८० | १७३.४२ | ५२.८४ |
| १५. | बी १० | ४०५५- इतर प्रशासकीय सेवेवरील भांडवली खर्च | ४३८.६० | २४.४३ | ५१.१७ | २२४.४० | ५१.१६ |
| १६. | एच ०८ | ४०५९- सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च | ४४१.७५ | २७२.६३ | ६१.७२ | २२२.५६ | ५०.३८ |
| | | **वरील विभागांनी केलेला खर्च** | **८६२७.३१** | **६०६६.८७** | | **५६६४.२६** | |
| | | **इतर विभागांनी केलेला खर्च** | **१९०८.९७** | **१८७४.७२** | | **१३७५.७७** | |
| | | **एकूण खर्च** | **१०५३६.२८** | **७९४१.५९** | | **७०४०.०३** | |

*स्रोत: विनियोजन लेखे - मार्च २०१६*

- **निरनिराळ्या विभागांच्या मागण्यांतर्गत शेवटच्या तीन महिन्यात करण्यात आलेला खर्च  रु. ७ हजार ९३९ कोटी असून १५० कोटींपेक्षा जास्त खर्च करणारे विभाग १६ असून त्यांचा एकूण खर्च  रु. ६ हजार ६६ कोटी ८७ लाख आहे. तर त्यापैकी शेवटच्या म्हणजे  मार्च महिन्यात झालेला  खर्च  रु. ७ हजार ४० कोटी असून वरील १६ विभागांनी त्यापैकी रु. ५ हजार ६६४ कोटी २६ लाख  खर्च केले आहेत.**

**शेवटच्या तीन महिन्यात अथवा शेवटच्या महिन्यात म्हणजे मार्च मध्ये निधी खर्च करण्याचे प्रमाण सातत्याने अधिक राहिले असून वर्ष संपत आले की घाईघाईने खर्च करण्याला शासनस्तरावर वेग येतो. हा निधी  वेळेवर खर्च केला तर आदिवासी विकास विभाग, महिला बाल कल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग या विभागांवर वेळेत खर्च केला तर वंचित घटकांना न्याय मिळू  शकतो.**

# शासनाचा सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी हात आखडता

## वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ४१ कोटी २५२ कोटी ८६ लाख कमी दिले

मागील ५ वर्षांमध्ये विकास खर्च १३.३ टक्के चक्रवाढ वार्षिक वृद्धीदराने वाढत आहे. याबद्दल शासनाचे अभिनंदन मात्र सन २०१७-१८ मध्ये सामाजिक सेवा, सर्वसाधारण शिक्षण तसेच अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांचे कल्याण यांच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

तक्ता क्र.१०

| सामाजिक क्षेत्र | खर्च व प्रमाण (२०१७-१८) | | |
|---|---|---|---|
| | अपेक्षित | प्रत्यक्ष | घट |
| सामाजिक सेवा | १३१६४८.८६ (६८.८) | ११३३०५.६७ (५९.२१) | १८३४७.१९ (९.५९) |
| सर्वसाधारण शिक्षण | ७१३१३.८३ (३१.७) | ५३५३८.२७ (२३.७९) | १७७७५.५६ (७.९१) |
| अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांचे कल्याण | १८८९७.०४ (८.०४) | १३७६७.५७ (६.११) | ५१२९.४७ (२.२९) |
| **एकूण** | **२२१८५९.७३** | **१८०६११.५१** | **४१२५२.२२** |

*स्त्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प २०१८-१९, आर्थिक पाहणी २०१७-१८*

- **सामाजिक सेवेसाठी वर्ष २०१७-१८ मध्ये रु. १ लाख ३१ हजार ६४८ कोटी ८६ लाख (६८.८) खर्च होणे अपेक्षित होते मात्र या वर्षात केवळ रु. १ लाख १३ हजार ३०५ कोटी ६७ लाख खर्च झाले असून खर्चाचे हे प्रमाण ५९.२१ टक्केच आहे. याचाच अर्थ यावर्षी रु. १८ हजार ३४७ कोटी १९ लाख कमी खर्च झाले आहेत.**
- **सर्वसाधारण शिक्षणासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये रु. ७१ हजार ३१३ कोटी ८३ लाख (३१.७) खर्च होणे अपेक्षित होते मात्र या वर्षात केवळ रु. ५३ हजार ५३८ कोटी २७ लाख खर्च झाले असून खर्चाचे हे प्रमाण २३.७९ टक्केच आहे. याचाच अर्थ यावर्षी रु. १७ हजार ७७५ कोटी ५६ लाख कमी खर्च झाले आहेत.**
- **अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांकांचे कल्याणासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये रु. १८ हजार ८९७ कोटी ४ लाख (८.०४) खर्च होणे अपेक्षित होते मात्र या वर्षात केवळ रु. १३ हजार ७६७ कोटी ५७ लाख खर्च झाले असून खर्चाचे हे प्रमाण ६.११ टक्केच आहे. याचाच अर्थ यावर्षी रु. ५ हजार १२९ कोटी ४७ लाख कमी खर्च झाले आहेत.**

**सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी उदा. आदिवासी विकास, महिला बाल कल्याण, सामाजिक न्याय व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या विभागांच्या योजनांसाठी सरकारकडे पैसा उपलब्ध होत नाही.**